**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ८६२३ /२०२३ दिनांक :- ६ /१२/२०२३

**प्रसिध्दीपत्रक**

**विषय :- कार्तिक यात्रा-२०२३ अनुषंगाने करण्यात येणाऱ्या वाहतूक बदलाबाबत**

-------oo--------

संत श्री. ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा व कार्तिक यात्रा २०२३ दि. ०५/१२/२०२३ ते १२/१२/२०२३ या कालावधीत साजरी होणार आहे. सदर कालावधीत आळंदी येथे भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते व त्यामुळे मोठया प्रमाणावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. या परिसरातील वाहतूक सुरळीत रहावी याकरीता वाहतूकीत आवश्यकतेनुसार बदल करणे गरजेचे आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/ ८७१/ सीआर-३७/ टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त,वाहतुक पुणे शहर, पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतूकीत अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

❖ दि. ०५/१२/२०२३ ते १२/१२/२०२३ रोजी दरम्यान अहमदनगर कडुन मरकळमार्गे आळंदीकडे जाणारी जड वाहतूक बंद करण्यात येत आहे.

✓ **पर्यायी मार्ग** :- अहमदनगर – नगर रोडने लोणीकंद - शास्त्रीनगर चौक – गोल्फ क्लब चौक - आंबेडकर चौक- आळंदी रोड जंक्शन – चंद्रमा चौक - होळकर पुलावरुन – पोल्ट्री फार्म चौक – जुना पुणे मुंबई रोडने बोपोडी चौक – नाशिक फाटा मार्गे इच्छितस्थळी

**(विजयकुमार मगर)**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबधितांना.**